महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/जागतिक महिला दिन-२०२२/२०२२/ 1062 दिनांक :- ०७.०३.२०२२
07 MAR 2022

**परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित
सर्व पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक/तांत्रिक अभ्यासक्रमांच्या संस्था
पुणे विभाग.

**विषय : दिनांक ०८ मार्च, २०२२ रोजी जागतिक महिला दिन साजरा करणेबाबत..**

संदर्भ : १) शासन परिपत्रक उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. संकीर्ण२०२२/प्र.क्र.३१/विशि-५, . दिनांक ०४.०३.२०२२.
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०२२/८६ दिनांक ०७.०३.२०२२.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, दिनांक ०८ मार्च, २०२२ हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त संदर्भ क्रमांक १ मधील शासन परिपत्रकान्वये उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत अकृषि विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, व शैक्षणिक संस्थांमध्ये खालील कार्यक्रमांचे आयोजन त्यांच्या निधीतून करणेबाबत कळविलेले आहे. सोबत संदर्भ क्र. १ मधील शासन परिपत्रकाची प्रत जोडण्यात येत आहे.

१. विद्यापीठांमध्ये मुलींच्या स्वसंरक्षणासाठी मार्गदर्शनपर प्रशिक्षणाचे आयोजन करणे.
२. महिला दिनाचे औचित्य साधून महिला सुरक्षाविषयक जाणीव जागृती निर्माण करणे व महिला सुरक्षा अभियान राबविणे.
३. महिला दिनाचे औचित्य साधून वृक्ष संवर्धन मोहिम राबविणे.
४. माझी वसुंधरा कार्यक्रमाचे आयोजन करणे.
५. कर्तुत्वसंपन्न व राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती असलेल्या महिलांचे व तज्ञ व्याख्यात्यांचे व्याख्यान व परिसंवादाचे आयोजन करणे.
६. महिला सुरक्षा/महिला सबलीकरण हा विषय केंद्रीभूत मानून वक्तृत्व, निबंध, रांगोळी, चित्रकला, भित्तीपत्र, पोष्टर, घोषवाक्य इ. उपक्रमांचे आयोजन करणे.
७. उपरोक्त उपक्रमांशिवाय महाविद्यालयांना इतरही पध्दतीने महिला दिन साजरा करता येईल.

तरी आपल्या संस्थेमध्ये दिनांक ०८ मार्च, २०२२ रोजी उपरोल्लिखित कार्यक्रमांचे आयोजन करुन आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नंतर या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक प्रसारीत झाल्यानंतर गुगल फॉर्ममध्ये भरून आवश्यक कागदपत्र/फोटोसह या विभागीय कार्यालयास सादर करावा.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

सोबत : संदर्भ क्रमांक १ मधील परिपत्रक.

प्रत :
१) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (कार्यासन क्र. २अ) यांना माहितीस्तव.
२) प्रोग्रॅमर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शीत करणेसाठी.

**अकृषि विद्यापीठे व त्याच्याशी संलग्नित महाविद्यालयामध्ये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व तत्सम शैक्षणिक संस्थांमध्ये दि.०८ मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र. ३१/ विशि-५**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक -. ४ मार्च, २०२२

**परिपत्रक**

संयुक्त राष्ट्र संघाने १९७५ मध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यास सुरुवात केली असून ज्याला आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय महिला दिन हा महिलांच्या सांस्कृतिक, राजकीय आणि सामाजिक व आर्थिक कामगिरीच्या सन्मानार्थ साजरा करण्यात येणारा जागतिक दिवस आहे. जगभरातील लैंगिक असमानतेविरुध्द कारवाई करण्याच्या समर्थनार्थ महिलांवरील हिंसा आणि अत्याचार यासारख्या मुद्यांकडे लक्ष वेधून महिला हक्क चळवळीबाबतीत जागरुकता निर्माण व्हावी या उद्देशाने हा दिवस जागतिक स्तरावर साजरा केला जातो.

२. या पार्श्वभूमीवर यावर्षी (२०२२) मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने Gender Equality Today for Sustainable Tomorrow (शाश्वत उद्यासाठी आजचे लैंगिक समानत्व) ही संकल्पना ठेवून ८ मार्च, २०२२ हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा करण्याचे ठरविले आहे. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीस २०२२ मध्ये ७५ वर्ष पुर्ण होत असल्याने भारतीय संस्कृतीचा कर्तृत्वाचा गौरवशाली इतिहास साजरा करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने १२ मार्च, २०२१ पासून ७५ आजादी का अमृतमहोत्सव हा उपक्रम देशभरात विविध पध्दतीने साजरा करण्याचे ठरविले आहे. या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत अकृषी विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे व तत्सम शैक्षणिक संस्थांमध्ये खालील कार्यक्रमाचे आयोजन त्यांचे निधीतून करण्यात यावे.

१. विद्यापीठांमध्ये मुलींच्या स्वसंरक्षणासाठी मार्गदर्शनपर प्रशिक्षणाचे आयोजन करणे.
२. महिला दिनाचे औचित्य साधून महिला सुरक्षाविषयक जाणीव जागृती निर्माण करणे व महिला सुरक्षा अभियान राबविणे.
३. महिला दिनांचे औचित्य साधून वृक्ष संवर्धन मोहीम राबविणे.
४. माझी वसुंधरा कार्यक्रमाचे आयोजन करणे

५. कर्तृत्वसंपन्न व राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती असलेल्या महिलांचे व तज्ञ व्याख्यात्यांचे व्याख्यान व परिसंवाद आयोजन करणे.

६. महिला सुरक्षा/महिला सबलीकरण या विषयास केंद्रभूत मानून वक्तृत्व, निबंध, रांगोळी, चित्रकला, भिंतीपत्र, पोष्टर, घोषवाक्य इ. उपक्रमाचे आयोजन करणे.

७. उपरोल्लिखित उपक्रमांशिवाय महाविद्यालयांना इतरही पध्दतीने महिला दिन साजरा करता येईल.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२२०३०४१८४९१७०००८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(प्रताप पां. लुबाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत-**

१.मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३.मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
५.कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे
६. विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये (सर्व कुलसचिव, अकृषि विद्यापीठे यांच्यामार्फत)
७.संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
८.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
९.संचालक, कला संचालनालय, मुंबई
९.कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे
१०.सर्व सह सचिव / उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
११. निवड नस्ती.